# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः21.09.2024** **वारःशनिवार**

---

1. देशातली प्राचीन कौशल्यं विकसित भारतासाठी उपयोगात आणण्याचा पथदर्शी आराखडा म्हणजे विश्वकर्मा योजना असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. पंतप्रधानांच्या हस्ते महाराष्ट्र सरकारच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचा तसंच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेचा प्रारंभ
3. सर्व शैक्षणिक संस्थांनी मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी आणि स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहित करावं-राष्ट्रपतींचं आवाहन
4. पंतप्रधान तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यासाठी रवाना आणि
5. चेन्नई कसोटी क्रिकेटच्या दुसऱ्या दिवशी भारताला 308 धावांची आघाडी, बांग्लादेश संघाचा पहिला डाव 149 धावांत आटोपला.

**पंतप्रधान**

विश्वकर्मा योजना म्हणजे देशातली प्राचीन कौशल्यं विकसित भारतासाठी उपयोगात आणण्याचा पथदर्शी आराखडा आहे. असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल वर्धा इथं राष्ट्रीय पीएम विश्वकर्मा कार्यक्रमात बोलत होते. विश्वकर्मा योजनेबाबत पंतप्रधान म्हणाले....

यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते राज्य सरकारच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजना आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेचा प्रारंभ करण्यात आला. पीएम विश्वकर्मा लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि कर्जवितरण करण्यात आलं. तसंच या योजनेच्या वर्षपूर्तीनिमित्त विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशन पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं.

अमरावती इथल्या पीएम मित्रा अर्थात पीएम मेगा इंटीग्रेटेड टेक्सटाइल रिजन्स अँड ऍपेरल या उद्योग संकुलाची पायाभरणी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते करण्यात आली. वस्त्रोद्योगात भारताला जागतिक बाजारपेठेत सर्वोच्च स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत असं मोदी यांनी सांगितलं. सरकार देशभरात 7 पीएम मित्रा उद्योग संकुलं उभारणार असून वस्त्रोद्योगातलं देशाचं गतवैभव पुन्हा मिळवून देणं हे सरकारचं उद्दीष्ट आहे. अमरावतीतलं वस्त्रोद्योग संकुल हे त्या दिशेनं टाकलेलं महत्त्वाचं पाऊल असल्याचं मोदी म्हणाले.

या कार्यक्रमाला केंद्रिय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री जीतन राम मांझी, कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांच्यासह राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते.

परंपरागत व्यवसाय करणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक प्रगतीसाठी पीएम विश्वकर्मा योजना अत्यंत महत्त्वाची आहे असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. बलुतेदार समाजसमुहाच्या जीवनात परिवर्तन घडवण्याची मोठी संधी या योजनेमधून उपलब्ध झाल्याचं उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं. तर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, पीएम मित्रा पार्कमुळे पांढऱ्या सोन्याला खऱ्या अर्थानं सोन्याचे दिवस येणार असून त्यामुळे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. राज्यातल्या विविध जिल्ह्यांमधल्या महाविद्यालयांत स्थापन केलेल्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचं उद्घाटन काल स्थानिक लोकप्रतिनिधी तसंच राज्यातल्या मंत्र्यांच्या उपस्थितीत झालं.

**<u>राष्ट्रपती</u>**

सर्व शैक्षणिक संस्था आणि शिक्षकांनी मुलींना उच्च शिक्षण आणि स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहन द्यावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. इंदूरमधील देवी अहिल्या विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात राष्ट्रपती काल संबोधित करताना बोलत होत्या. पालक आणि शिक्षकांचा पाठिंबा आणि मार्गदर्शनानं मुली मोठी स्वप्नं पाहू शकतात आणि ती पूर्ण करू शकतात, देशाच्या विकासात ही खरी भागीदारी होऊ शकते असंही मुर्मू म्हणाल्या. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमता आणि आवडींच्या आधारे त्यांच्या भविष्यातील कारकीर्द निवड करण्याचा सल्ला दिला. भारताच्या स्वच्छता सर्वेक्षणात सलग सात वेळा प्रथम क्रमांक मिळविलेल्या इंदूरचं कौतुक करताना राष्ट्रपती म्हणाल्या की इंदूरच्या नागरिकांनी स्वच्छतेच्या क्षेत्रात एक विलक्षण आदर्श सर्वांसमोर ठेवला आहे. मध्य प्रदेशचा दोन दिवसांचा दौरा आटोपल्यानंतर राष्ट्रपती मुर्मू झारखंडमधील रांची इथं पोहोचल्या आहेत. रांची इथल्या ICAR-राष्ट्रीय दुय्यम कृषी संस्थेच्या शताब्दी सोहोळ्यात त्या आज संबोधित करणार आहेत.

**<u>मोदी-अमेरिका</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवस अमेरिकेच्या दौऱ्यावर रवाना झाले आहेत. परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी या दौऱ्याची काल नवी दिल्लीत बातमीदारांना माहिती देताना सांगितलं की, या भेटीदरम्यान पंतप्रधान आज डेलावेअरमधील विल्मिंग्टन इथं होणाऱ्या क्वाड शिखर परिषदेमध्ये भाग घेतील. या दौऱ्यात वार्षिक QUAD शिखर परिषदेत सहभागी होण्यापासून ते संयुक्त राष्ट्रांच्या शिखर परिषदेला संबोधित करण्यासह उच्चस्तरीय व्यवहार आणि बैठकांची रेलचेल आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांच्या डेलावेअरमधील विल्मिंग्टन या गावी QUAD शिखर बैठकीतील सहभागाने ते दौऱ्याची सुरुवात करतील. बायडन यांच्यासोबत क्वाड गटातील इतर सदस्यांच्या नेत्यांसोबत मोदी द्विपक्षीय बैठक घेणार आहेत. त्यानंतर, पंतप्रधान न्यूयॉर्कला जातील, तिथं उद्या भारतीय नागरिकांशी संवाद साधतील. कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर्ससह उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात दोन्ही देशांमधील अधिक सहकार्य वाढवण्यासाठी ते अमेरिकेत स्थापित आघाडीच्या कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधतील. आपल्या तीन दिवसीय दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी, मोदी न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्र महासभेत शिखर परिषदेला संबोधित करतील. उत्तम भविष्यासाठी बहुपक्षीय उपाय अशी या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना आहे. परराष्ट्र सचिवांनी सांगितलं की पंतप्रधान या परिषदेच्या अनुषंगानं अनेक परदेशी नेत्यांसोबत देखील संवाद साधणार आहेत.

**<u>धवल-क्रांति</u>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी द्वितीय धवलक्रांतिमुळे महिलांचं सक्षमीकरण, मुलांमधील कुपोषणाशी लढा, रोजगार निर्मिती, सेंद्रिय शेती बळकट करणं आणि सेंद्रिय शेतीद्वारे जमिनीची सुपीकता वाढवणे शक्य होणार आहे. आपल्या मंत्रालयाच्या 100 दिवसांत घेतलेल्या परिवर्तनात्मक उपक्रमांच्या मालिकेवर काल नवी दिल्ली इथं राष्ट्रीय स्तरावरील परिषदेत ते बोलत होते. ते म्हणाले की आज भारत जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश बनला

आहे. सर्वाधिक महिला दुग्धव्यवसाय क्षेत्रात गुंतलेल्या आहेत, काहींनी एकट्या गुजरातमध्ये 60 हजार कोटी रुपयांचा व्यवसाय केला असल्याची माहिती शहा यांनी दिली. सहकार मंत्रालय असायला हवं ही अनेक वर्षांपासूनची मागणी होती आणि ती मागणी एनडीए सरकारनं पूर्ण केली आहे असं सांगून शहा म्हणाले की, सरकार सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी गती देत आहे. या प्रसंगी शहा यांनी दोन लाख नवीन प्राथमिक दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची निर्मिती आणि बळकटीकरण, आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या गावं किंवा पंचायतींमध्ये, द्वितीय धवलक्रांतिवरील मार्गदर्शक सूचना आणि सहकारी संस्थांमधील सहकार्य यावरील मार्गदर्शक पुस्तिकेचंही प्रकाशन केलं.

**निर्यात-बातमी**

भारतीय संरक्षण निर्यात युक्रेनला वळवण्याबाबत माध्यमांमध्ये प्रकाशित बातमी भारतानं फेटाळून लावली आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते, रणधीर जयस्वाल यांनी यासंदर्भात बातमीदारांच्या प्रश्नांना नवी दिल्लीत उत्तर देताना सांगितलं की, अशा बातम्या दिशाभूल करणाऱ्या आहेत. जयस्वाल म्हणाले की, भारतानं आजवर लष्करी आणि दुहेरी वापराच्या वस्तूंच्या निर्यातीसंदर्भात आंतरराष्ट्रीय दायित्वांचं पालन अतिशय शुद्ध पद्धतीनं केलं आहे.

**क्रिकेट**

भारत आणि बांग्लादेश क्रिकेट संघांमध्ये चेन्नई इथं सुरू असलेल्या कसोटी सामन्यात काल दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताच्या 3 गडी बाद 81 धावा झाल्या होत्या. रिषभ पंत 12 आणि शुभमन गिल 33 धावांवर खेळत आहेत. तत्पूर्वी भारतानं आपल्या पहिल्या डावात 374 धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देताना बांग्लादेशचा संघ केवळ 149 धावाच करू शकला. त्यामुळे भारताला 308 धावांची आघाडी मिळाली. जसप्रीत बुमराहनं 4 तर मोहम्मद सिराज, आकाशदीप आणि रविंद्र जडेजा यांनी बांग्लादेशच्या प्रत्येकी 2 फलंदाजांना बाद केलं.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.